दै. देशो...

# मोक्का गुन्ह्यातील आरोपी 'स्थागुशा'च्या जाळ्यात



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ उमरी तालुक्यातील सिंधी येथे व्हीपीके साखर कारखान्याचे समोर कै.व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्था येथे दरोडा घातलेल्या मोक्का गुन्ह्यातील आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात सापडला आहे.

सिंधी येथे १ ऑक्टोबर रोजी दुपारी दरोडा टाकल्या प्रकरणी उमरी पोलिसांनी गुरनं २४०/२०२२ कलम ३९५ भादविंसह कलम ४/२५ शस्त्र अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर प्रकरणी मोक्का कायद्यान्वये कारवाई करुन तपास करुन तपासाअंती न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात पाहीजे असलेला आरोपी शेख सोहेल शेख रज्जाक रा. तेहरानगर, शिवाजीनगर, नांदेड हा फरार होता. दरम्यान सदर आरोपी शेख सोहेल शेख रज्जाक रा.तेहरानगर, शिवाजीनगर हा बरकत कॉम्पलेक्स येथे असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. स्थागुशाचे पोनि द्वारकादास चिखलीकर यांनी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांना सांगितल्यानंतर त्यांच्या आदेशावरून पथक १० फेब्रुवारी रोजी त्याठिकाणी पोहचले असता आरोपीने पोलीसांना पाहुन पळ काढला. त्याचा पाठलाग करुन त्यास पकडुन ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. सदर आरोपीविरुध्द माली गुन्हे दाखल असुन, तो वर नमुद गुन्ह्यातील फरार आरोपी असल्यामुळे त्यास या गुन्ह्यात अटक करुन तपास करण्यासाठी त्यास पोलीस ठाणे उमरी येथे वर्ग करण्यात आले आहे. या पथकात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पांडुरंग माने, पोउपनि शाहु, अंमलदार मोतीराम पवार, तानाजी येळगे, शंकर केंद्रे, हेमंत बिचकेवार यांचा समावेश होता.

दै. देशोन्नती दि. 11-02-2023

# फरार आरोपी शोधायला गेले अन् दरोडेखोर हाती लागले

## दरोडा टाकणाऱ्या पाच जणांच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या; वेदांतनगरातील घरावर भरदिवसा दरोडा



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ मालेगाव मार्गाशेजारी असलेल्या वेदांत नगरातील एका घरावर १० फेब्रुवारी रोजी सकाळी दरोडा टाकणाऱ्या राजस्थानातील ५ दरोडेखोरांच्या मुसक्या वजीराबाद ठाण्याचे डीबी पथक व लिंबगाव पोलिसांनी आवळल्या असून बसंतानगर येथील गोळीबार प्रकरणात दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केल्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या मालेगाव मार्गावर फरार आरोपीचा वजीराबाद ठाण्याचे डीबी पथक व लिंबगाव पोलिस १० फेब्रुवारी रोजी शोध घेत होते. सदर पोलिस वेदांतनगरात आले असता त्या परिसरात ५ संशयित आढळून आले. पोलिसांना संशय आल्यामुळे त्यांनी त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता उडवा उडवीची उत्तरे मिळत असल्याने पोलिसांनी त्यांना खाक्या दाखविला. चौकशीअंती ५ जण ज्या ठिकाणी थांबले होते त्याचठिकाणी असलेल्या एका घरात घुसून महिला एकटी असल्याचे पाहून तिच्या गळ्यातील पेंडॉलसह मंगळसुत्र चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी यामध्ये प्रदीप स्वामी,पवनकुमार जाट, राजेंद्रकुमार जाट, पंकज स्वामी,मनिष सेन यांना ताब्यात घेऊन भाग्यनगर पोलिस ठाण्यात आणले.त्यांच्याकडून ८ हजार रुपये किमतीचे पेंडॉलसह मंगळसुत्र व चाकु जप्त केला.दरम्यान विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत ९ फेब्रुवारी रोजी गोळीबार करून एकास जखमी करणाऱ्या दोन आरोपींना स्थागुशाचे पोनि द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने संतोष कर्णवाड व हरजितसिंघ उर्फ जितू पणू या दोघांना अटक केल्याचे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगितले. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक खंडेराव धरणे,उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.सिद्धेश्वर भोरे, स्थागुशाचे पोनि द्वारकादास चिखलीकर, भाग्यनगरचे पोनि अशोक अनंत्रे, लिंबगावचे सपोनि चंद्रकांत पवार उपस्थित होते.